**MHBH030022932022**

खटला दाखल तारीख : २०.१०.२०२२
खटला नोंदणी दिनांक : २०.१०.२०२२
खटला निकाल तारीख : ०१.०७.२०२३
कालावधी : ०० वर्ष ०८ महिने ११ दिवस

## मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय, भंडारा
## (आशिष के. आवारी, पीठासीन अधिकारी)

**नियमित फौजदारी खटला क्रमांक २५४/२०२२** **नि. क्र.१६**

महाराष्ट्र शासनतर्फे,
पोलीस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन, भंडारा
तह. व जि. भंडारा. **अभियोग पक्ष**

..**विरुध्द**..

**वसंतराव आत्माराम गोस्वामी**
वय ७४ वर्षे, व्यवसाय : वसतीगृह संचालक
रा. विद्यानगर गणेशपूर, भंडारा,
तह. व जिल्हा भंडारा. **आरोपी**

**आरोपः भारतीय दंड विधानाचे कलम ५०९ अन्वये**

---

अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ :— श्री. आर. आर. आस्टोनकर
आरोपीतर्फे विधिज्ञ :— श्रीमती सरला बोरकर

---

## न्यायनिर्णय
(दिनांक ०१ जुलै, २०२३ रोजी पारीत)

आरोपीविरूध्द भा.दं.वी. चे कलम ५०९ अन्वये अभियोग चालविण्यात आला.

२) अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात पुढील प्रमाणे :—

सौ. प्रिती प्रदिप गोस्वामी (फिर्यादी) रा. विद्यानगर भंडारा यांचे आरोपी हे सासरे आहेत. फिर्यादी हया ममता कन्या वसतीगृह, विद्यानगर भंडारा येथे अधिक्षीका या पदावर सन २०१९ पासून काम करीत असून आरोपी त्या वसतीगृहाचे संचालक आहेत. फिर्यादी व आरोपी हे एकाच घरात राहत असून दिनांक २१/०७/२०२२ रोजी फिर्यादी आपल्या मुलींसह बेडरुममध्ये हजर असताना आरोपीने फिर्यादीचा बेडरुमचा दरवाजा ठोकला. तेव्हा फिर्यादीने दरवाजा उघडला असता आरोपीने फिर्यादीस ''अंगातले कपडे काढ, माणसाला खुश कसे करायचे ते मी सांगतो'' असे म्हटले. त्यामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशन भंडारा येथे आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली.

३) फिर्यादीच्या फिर्यादवरून आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन, भंडारा येथे गुन्हा क्रमांक ३३४/२०२२, भारतीय दंड विधानाचे कलम ५०९ अन्वये नोंदविण्यात आला व तपास पोलीस हवालदार इर्शाद खान (तपास अधिकारी) यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासी अधिका—याने तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा तयार केला व साक्षीदारांचे बयान नोंदवून तपासाअंती आरोपीविरूध्द दोषारोपपत्र न्यायप्रविष्ट केले.

४) न्यायालयाने आरोपीविरूध्द निशाणी क्रमांक १० वर दोषारोप निश्चित करून त्याला वाचून व समजावून सांगितले. त्याची जबानी

निशाणी क्रमांक ११ वर वेगळी नोंदविण्यात आली असता त्याने गुन्हा कबुल नसल्याचे व मामला चालविण्याची विनंती केली. आरोपीविरूध्द त्याला सदर गुन्हयात गोवणारा कोणताही पुरावा मिळून न आल्यामुळे त्याचे फौजदारी प्रकिया संहितेचे कलम ३१३ अन्वये बयान नोंदविण्यात आले नाही.

**५)** अभियोग पक्षाचे एकुन कथनावरून खालील मुद्दे माझे समक्ष अंतीम न्यायनिर्णयाकरिता निर्माण झाले, त्यावर मी माझे निष्कर्ष कारणासहीत खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
| --- | --- | --- |
| **१** | दिनांक २१/०७/२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता व दिनांक २२/०७/२०२२ रोजी सायंकाळी ०७:०० वाजता मौजा गुजराती कॉलनी, विद्यानगर, भंडारा येथे आरोपीने फिर्यादीला लज्जा वाटेल किंवा तिच्या लज्जेस धक्का बसेल या इरादयाने तिला अश्लील शिविगाळ करून अपमानीत केले व त्याद्वारे भा.दं.वी. चे कलम ५०९ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **नाही** |
| **२** | आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमीमांसा

**६)** अभियोग पक्षातर्फे गुन्हा सिध्द करण्याच्या दृष्टीने सौ. प्रिती गोस्वामी (फिर्यादी) हिची साक्ष निशाणी १३ वर नोंदविण्यात आली. फिर्याद निशाणी १४ वर आणि घटनास्थळ पंचनामा निशाणी १५ वर

आहेत. तसेच फिर्यादी व आरोपी यांची आपसी समझोता पुरसीस निशाणी १२ वर आहे. विद्वान सरकारी अभियोक्ता श्री. आर. आर. आस्टोनकर आणि आरोपीतर्फेविद्वान वकील श्रीमती सरला बोरकर यांचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्र. १ व २ करिता** :—

**७)** सौ. प्रिती प्रदिप गोस्वामी (फिर्यादी) हिने तिच्या पुराव्यात आरोपी तिचे सासरे आहेत. तसेच आरोपी व त्याची पत्नी फिर्यादीसोबत एकाच घरात राहत असल्याचे सांगितले आहे. घटना अंदाजे दहा ते अकरा महिन्यांपूर्वी घडली असून घटनेच्या वेळी क्षुल्लक कारणावरुन आरोपीसोबत किरकोळ वाद झाल्याचे स्पष्ट केले आहे. परंतु याव्यतिरिक्त तिला लज्जा वाटेल किंवा तिच्या लज्जेस धक्का बसेल या इरादयाने तिला अपशब्द बोलून अपमानीत केल्याची घटना आरोपीमार्फत घडल्याचे सपशेल नाकारले आहे. त्याचप्रमाणे फिर्याद (निशाणी १४) रागाच्या भरात पोलीस ठाण्यात दाखल केल्याचे कथन केले असून त्यातील मजकुराबाबत मात्र पुर्णत: अनाभिज्ञता असल्याचे तिने तिच्या पुराव्यात स्पष्टपणे सांगितले आहे. फिर्यादी अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने अभियोगपक्षाने तिची उलटतपासणी देखील घेतली परंतू त्याचासुध्दा अभियोगपक्षास कुठलाही फायदा झाला नाही. त्याचप्रमाणे सदर प्रकरणात फिर्यादी ही स्वत: फितूर झाल्यामुळे आरोपीविरूध्दचा गुन्हा सिध्द करणारा कोणताही पुरावा अभिलेखावर येवू शकला नाही. अशा परिस्थितीत गुन्हा कलम ५०९ भारतीय दंड विधान मध्ये अंतर्भूत असलेले मौलीक घटक म्हणजेच आरोपीमार्फत फिर्यादीला लज्जा वाटेल या इरादयाने तिला अश्लील

शिविगाळ करून अपमानीत करणे ही बाब एकंदर पुराव्यात आढळून येत नसल्याने फिर्यादीच्या पुराव्यास कुठलाही अर्थ प्राप्त होत नाही. किंबहुना असा पुरावा गुन्हा सिध्दतेच्या दृष्टीने अत्यंत कमकुवत स्वरुपाचा मला आढळून येतो. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याच्या दृष्टीने योग्य व समर्पक नसुन त्याद्वारे आरोपीविरुध्दचा कलम ५०९ भारतीय दंड विधान अन्वये गुन्हा सिध्द होऊ शकत नाही असे निष्कर्ष मी नोंदवितो व आरोपीची निर्दोष मुक्तता करणे मी क्रमप्राप्त समजतो. सबब खालील आदेश पारीत करतो.

**आदेश**

१. आरोपी वसंतराव आत्माराम गोस्वामी याची भारतीय दंड संहिताचे कलम ५०९ या शिक्षेस पात्र गुन्हयातून फौजदारी प्रकिया संहिताचे कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जमानतीचे बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम ४३७—अ प्रमाणे रुपये ५०००/— ची जामीन दयावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by Ashish Keshaorao Awari
Date: 2023.07.03 14:48:33 +0530

(आशिष के. आवारी)
मुख्य न्यायदंडाधिकारी
भंडारा.

दिनांकः— ०१/०७/२०२३

---

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same word to word as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Rohini Rajendra Kumbhalkar |
| Name of the Court | : | Chief Judicial Magistrate Bhandara. |
| Date of Judgment | : | 01.07.2023 |
| Judgment signed by the Presiding Officer | : | 01.07.2023 |
| Judgment uploaded on | : | 01.07.2023 |

................